सुराज्य सोलापूर

गुरूवार, दि. २३ जुलै २०१५

# आजपासून 'वसुंधरा'

## महोत्सवामध्ये ४ दिवस सोलापुरात विविध कार्यक्रम

## अरूण देशपांडे यांना वसुंधरा पुरस्कार जाहीर

KIRLOSKAR Vasundhara Environment • Wildlife • Energy • Air • Water

सोलापूर / प्रतिनिधी

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास गुरूवार दि. २३ जुलैपासून प्रारंभ होत आहे. दरम्यान वॉटर बँकेचे अरूण देशपांडे यांना वसुंधरा सन्मान पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. एस.पी. वैद्य यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापुरात या महोत्सवाचे ७ वे वर्ष आहे. दि. २३ ते २६ जुलै दरम्यान हा महोत्सव होत आहे. या अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छायाचित्र प्रदर्शन, रॅली, चित्रकला स्पर्धा, हसत खेळत पर्यावरण, प्रश्नमंजूषा, ग्रीन कॉलेज क्लीन कॉलेज या विषयावर व्याख्यान, नेचर वॉक, कथानाट्य आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. यंदा महोत्सवाचे सातवे वर्ष असून, या महोत्सवाचा विषय शुन्य कचरा-सुरुवात आपल्यापासून असा आहे.

भारतातील सर्वात मोठा हा पर्यावरण महोत्सव असून वन्य, जीवन, हवा, पाणी आदी या पाच विषयांना समर्पित आहे. या महोत्सवात दि. २६ जुलै रोजी फडकुले सभागृहात प्रयोगशील शेतकरी व वॉटर बँकेचे अरूण देशपांडे यांना अनिल अवचट यांच्या हस्ते वसुंधरा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी पोलीस आयुक्त रवींद्र सेनगावकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस विरेंद्र चित्राव, अमोल चाफळकर, सुभेदार बाबाराव पेठकर, प्रा. नरेंद्र काटीकर, ऋषिकेश कुलकर्णी,डॉ. रायते उपस्थित होते.

**गुरूवार**

वसुंधरा महोत्सवाचे उद्घाटन, सोलापूर विद्यापीठ दुपारी २ ते ५, छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन व व्याख्यान, फडकुले संकुल सायं ६ ते ८.

**शुक्रवार**

रॅली आणि चित्रकला स्पर्धा, चार पुतळा- फडकुले संकुल, सकाळी ८ ते ११, चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन, फडकुले संकुल सायं ५.३० वाजता.

**रविवार**

नेचर वॉक, स्मृतीवन, सकाळी ७ ते ९, पथनाट्य चार पुतळा, दुपारी २ ते ४, समारोप कार्यक्रम, फडकुले संकुल, सायं ५ वाजता.

**शनिवार**

वॉक फॉर हेरिटेज, डॉ. कोटणीस निवास, स. ७ ते ९, हसत-खेळत पर्यावरण, ज्ञानप्रबोधिनी प्रशाला ९.३०, प्रश्नमंजूषा मॉडर्न हायस्कूल, वेळ स.११.३०, ग्रीन कॉलेज कॉन्फरन्स, मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट, दुपारी २ वा., फिल्म स्क्रिनिंग, फडकुले संकुल सायं ७ वाजता.


अरूण देशपांडे


अनिल अवचट